**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.**

परिपत्रक क्र.कोविमं /माध्य. परीक्षा/मार्च २०१९ /श्रेणी तक्ते/ 3137/ दिनांक १९/०२/२०१९

कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा प्रमुखांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, **मार्च २०१९ माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेस पुनर्रचित अभ्यासक्रमाने प्रविष्ठ होणाऱ्या नियमित (Fresh) व जुन्या अभ्यासक्रमाने प्रविष्ठ होणाऱ्या पुनर्परीक्षार्थी (Repeater) विद्यार्थ्यांची श्रेणीतक्ते (Grade List) OMR पध्दतीप्रमाणे** वितरण केंद्रावर **शनिवार दिनांक ०९/०२/ २०१९ रोजी** वितरीत करण्यात आलेली आहेत. तरी सदरची नियमित व पुनर्परिक्षार्थी (**Fresh & Repeater**) विद्यार्थ्यांची श्रेणीतक्ते बिनचूक भरुन ते **शनिवार दिनांक ०२ मार्च, २०१९** रोजी वितरण केंद्रावरील प्रतिनिधीकडे निर्धारित वेळेत हस्तपोहोच जमा करण्यात यावेत. उशीरा प्राप्त होणाऱ्या श्रेणीतक्त्याबाबत दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. **सदरचे श्रेणीतक्ते इतर कोणत्याही पाकिटात न भरता कार्यालयाने पुरविलेल्या श्रेणीतक्त्याच्या पाकिटातच (Grade List पाकिटात) भरुन सदरचे श्रेणीतक्त्याचे** पाकिट पाठवावे. तसेच श्रेणीतक्त्याच्या पाकिटावर ठळक अंकात शाळेचा सांकेतिक क्रमांक लिहावा. श्रेणीतक्ते वेळेत जमा न केल्यास विद्यार्थ्यांच्या निकालाचे कामात काही समस्या निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहिल याची गांर्भीयाने नोंद घ्यावी.

**श्रेणीतक्ते भरताना घ्यावयाची काळजी –**

१) **पुंर्नरचित अभ्यासक्रमाद्वारे नियमित (Fresh) विद्यार्थ्यांची श्रेणीतक्ते OMR पध्दतीने भरावयाची असल्यामुळे नियमित विद्यार्थ्यांना या पध्दतीनुसार श्रेणीतक्ते देण्यात आलेली आहेत. (अ)** सदरहू श्रेणीतक्त्यामध्ये हे P1 (Physical Education) & R7 (**स्वविकास व कलारसास्वाद**) हे शालेय विषय सक्तीचे असल्यामुळे त्यांचे विषय कोड श्रेणी तक्त्यात नमूद केलेले आहेत. या विषयाच्या खालील चौकटीमध्ये आतील चौकटीला स्पर्श न करता खालीलप्रमाणे अंकामध्ये (**Numeric Code**) श्रेणी नोंदविण्यात याव्यात. **(ब) जुन्या अभ्यासक्रमानुसार** कार्यानुभव/शालेय वैकल्पिक विषयाची श्रेणी भरताना विषय क्रमांकासाठी २ चौकटी दिलेल्या आहेत. त्या २ चौकटीच्या आतील चौकटीला स्पर्श न करता विषय कोड दर्शविण्यात यावा व त्याच्यापुढील श्रेणी चौकटीच्या आतील चौकटीमध्ये खालीलप्रमाणे अंकामध्ये (**Numeric Code**) श्रेणी नोंदविण्यात याव्यात. उदा.

| Index No | Grade Code |
|---|---|
| J 9 | 3 |

७) **जुन्या अभ्यासक्रमानुसार प्रविष्ठ होणाऱ्या पुनर्परीक्षार्थी (Repeater) विद्यार्थ्यांची श्रेणीतक्ते प्रचलित पध्दतीप्रमाणेच भरण्यात यावी. फक्त गैरहजर विद्यार्थ्यासाठी AA अशी श्रेणी नोंदविण्यात यावी. श्रेणी तक्ते भरताना कोणत्याही परिस्थितीत व्हाईटनरचा वापर करणेत येवू नये .**

८) श्रेणीतक्ते भरताना प्रत्येक विद्यार्थ्याच्या बैठक क्रमांकासमोर शालेय व ऐच्छिक विषयाचे **सांकेतांक (Index No.)** नमुद करून त्या विषयात विद्यार्थ्याने संपादित केलेली **श्रेणी (Grade) अंकामध्ये (Numeric Code मध्ये) अचूक नोंदवाव्यात.** श्रेणीतक्त्यात श्रेणी नोंदविताना श्रेणी तक्त्याच्या खाली मुद्रित करण्यात आलेल्या सूचना काळजीपूर्वक लक्षात घेऊन खालील प्रमाणे श्रेणीची नोंद करावी.

- A ग्रेडसाठी 3 (60% &above marks)
- B ग्रेडसाठी 2 (45% & 59% marks)
- C ग्रेडसाठी 1 (35% & 44% marks)
- D ग्रेडसाठी 0 (35% & below marks)
- E ग्रेडसाठी 4 (Exempted subject )
- गैरहजरसाठी विद्यार्थ्यासाठी A
- अपंगासाठी (Handicapped) 5 (फक्त शारिरीक शिक्षणाकरीता) (मात्र इतर विषयास श्रेणी द्यावी)
- **मार्च २००८ पूर्वीचे परीक्षार्थी मार्च २०१९ च्या परीक्षेस रिपीटर म्हणून प्रविष्ठ होत असतील तर अशा विद्यार्थ्यांना पूर्वी पर्यावरण (38) व व्यक्तिमत्व विकास (R6) विषय नसल्यामुळे या विषयासाठी NN श्रेणी दर्शवावी.**

९) **पुनर्परिक्षार्थी विद्यार्थ्यांचे शालेय वैकल्पिक विषयास पास श्रेणी मिळून त्यांचा तो विषय सुटलेला असल्यामुळे अशा विद्यार्थ्यांचे श्रेणीतक्ते भरताना त्या विषयापुढे विषय सूटसाठी 4 (Exempted) अशी श्रेणी दर्शवावी.**

१०) काही नियमित पुनर्परिक्षार्थी विद्यार्थी/ज्या विद्यार्थ्यांचे श्रेणी परीक्षेचे विषय सुटलेले नाहीत असे विद्यार्थी मार्च २०१९ च्या परीक्षेस प्रविष्ठ होत असतील तर त्याचे श्रेणीतक्ते भरताना प्रत्येक विद्यार्थ्याच्या बैठक क्रमांकासमोर शालेय व ऐच्छिक विषयाचे कोड नंबर नमुद करून त्या विषयात विद्यार्थ्याने संपादीत केलेली श्रेणी (Grade) अचूक नोंदवाव्यात.

११) **गैरहजर विद्यार्थ्यासाठी अ व ३५% पेक्षा कमी श्रेणी दर्शविताना ० श्रेणी लाल शाईने लिहाव्यात. मात्र या श्रेणी लिहिण्यापूर्वी विद्यार्थ्यास ३५% पेक्षा कमी गुण व विद्यार्थी गैरहजर असल्याची खात्री करूनच श्रेणी लिहाव्यात. मंडळाच्या असे निदर्शनास आले आहे की निकालानंतर 0 व A श्रेणी दिलेला विद्यार्थी लेखी परीक्षेस उत्तीर्ण असूनही केवळ या श्रेणी दिल्यामुळे त्यांचा निकाल अनुत्तीर्ण म्हणून जाहीर होतो. निकालानंतर शाळाप्रमुख श्रेणी दुरूस्ती व निकाल दुरुस्तीचा प्रस्ताव सादर करतात. निकालानंतर कोणत्याही श्रेणीमध्ये व निकालात बदल केला जाणार नाही व विद्यार्थ्यास चूकीची श्रेणी दिल्यामुळे विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी शाळाप्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी.**

विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर